महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-११ अंक-३, पृष्ठे -८

एप्रिल - मे २०१७



**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रिय अधिकारी/कर्मचारी बंधु आणि भगिनींनो,

महापारेषण कंपनी देशातील पारेषण प्रवर्गातील महत्वाची व अग्रगण्य कंपनी आहे. आपणा सर्वांच्या चांगल्या कामगिरीमुळे हा लौकिक कंपनी प्राप्त करु शकले. अनेकांनी ह्या कंपनीचा पाया भक्कम करण्यासाठी परिश्रम घेतले. त्यापैकी एक माझे सहकारी श्री. ओ. के. एम्पाल दि. २५.०५.२०१७ रोजी संचालक (सं) पदाचा कार्यभार समाप्तीनंतर सेवेतून मुक्त झाले. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल महापारेषण परिवार त्यांचे आभारी आहोत व त्यांच्या पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देते.

नवीन आधुनिक युगात आपल्याला सतत बदलास सामोरे जावे लागणार आहे. त्याकरिता आपण सक्षम असणे गरजेचे आहे. विजक्षेत्र अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे विजक्षेत्राचा विकास हा संपूर्ण राष्ट्राच्या विकासाकरिता महत्वाची भुमिका बजावत असतो.

आज आपण नियोजनानुसार फार मोठ्या प्रमाणावर पारेषण यंत्रणेचे जाळे पसरवण्यात यशस्वी झालो. उपकेंद्रे, वाहिनी, SLDC, STU, Automation, ERP/IT, Inventory Management, Finanancial Management, People Management, प्रशिक्षण आदी विविध विषयांवर आपण विकास करण्यात यशस्वी ठरलो. मात्र, अजुनही यंत्रणा सक्षम, तत्पर व Fool Proof करण्याची फार मोठी कामगिरी बाकी आहे.

यंत्रणा उभी करणे एक भाग आहे व यंत्रणेची चांगल्या प्रकारे देखभाल व ती कार्यरत ठेवणे दुसरी बाब आहे. त्याकरिता System & Processes व्यवस्थित गठण करुन त्यावर अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. ते करीत असताना जिवित-भौतिक नुकसान होणार नाही. ते पाहणेसुध्दा तितकेच महत्वाचे आहे.

आजही आपल्याकडे दुर्घटना होताना मी पाहतो व व्यथित होतो. दुर्घटना होणे यंत्रणामध्ये त्रुटी असाव्यात ह्याचे द्योतक आहे. त्याकरिता सतत कार्यप्रणालीबाबत अभ्यास करुन त्यातील उणिवा शोधुन काढुन ती Fool Proof करणे हाच त्यावर उपाय आहे. कोणताही निष्काळजीपणा ह्याबाबत प्रशासन सहन करणार नाही व कर्तव्याची उपेक्षा करण्यावर कडक कारवाई करण्यात येईल. माझे निर्देश आहेत की, आपल्या कार्यक्षेत्रात दुर्घटना होणार नाही ह्याची सुनिश्चित करण्याची जबाबदारी विभागप्रमुखांची राहील व त्यावरील अधिकारी त्याचे नियंत्रण करतील.

Automation वर आपण नामवंत संस्थेच्या प्रतिनिधींबरोबर कार्यशाळा घेऊन ऊहापोह केलेला आहे. या चर्चेतून आता उपक्रम तयार करून त्याची उत्तम कार्यवाही करण्याबाबत पावले उचलण्यात आलेली आहेत. त्याचा फार मोठा फायदा भविष्यात आपल्या पारेषण प्रणाली सक्षम करण्यास्तव होईल, याची मला खात्री आहे.

अशाच प्रकारे प्रकल्प व्यवस्थापनावर सक्षमीकरणाकरिता काम सुरु केले आहे. Vendor Supply Chain सक्षम करण्याकरिता मागील वर्षी केलेल्या Vendor Meet पासून मिळालेल्या सुचनांचे विश्लेषण करून त्यावर कृती आराखडा तयार होत आहे.

ERP/IT वर अधिक भार देऊन अनेक नवीन उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. फक्त तांत्रिक विषयांवर भर न देता ERP द्वारे प्रशासनिक प्रकल्प जसे की OLRT/OLPMS कार्यान्वित करण्यात येत आहेत व त्याचे काम आता अंतिम टप्प्यात आलेले आहे.

नेहमीप्रमाणे २०१७-२०१८ करिता प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे व त्यानुसार Budget Allocation करून प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

अशा प्रकारे अनेक क्षेत्रात आपण सुधारणा करण्याचे प्रयत्न करत आहोत आपल्या सर्वांच्या योगदानाने व सहकार्याने मला आशा आहे, की वर्ष २०१७-२०१८ मध्ये सुध्दा भरीव कामगिरी करण्यास आपण यशस्वी ठरु.

सततचे नियोजन व आढावा आपल्याला आपली दिशा व दशा योग्य राखण्यास मदत करेल. त्यामुळे आपण सर्वांनी २०१६-२०१७ च्या Targets चा आढावा घेऊन २०१७-२०१८ करिता Targets आपल्या वरिष्ठाकडुन ठरवून घेणे गरजेचे आहे.

सर्वांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा.

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

# मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची कराड परिमंडळाच्या कोल्हापूर येथे आढावा बैठक

मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री. राजीव कुमार मित्तल यांची कराड परिमंडळअंतर्गत कोल्हापूर येथे आढावा बैठक दिनांक ०४ व ०५ मे



२०१७ रोजी संपन्न झाली. सदर भेटीदरम्यान दि. ४ मे २०१७ रोजी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मेंढीगिरी, शेड्याळ येथील पवनउर्जा प्रकल्प उपकेंद्र तसेच ४०० केव्ही ग्रहण केंद्र अलकूड येथील कामाची पाहणी केली व उपकेंद्राचा वापर योग्यरितीने करण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना केल्या. मा.



अध्यक्षांनी दिनांक ०५ मे २०१७ रोजी २२० केव्ही उपकेंद्र तिळवणी, ४०० केव्ही ग्रहण केंद्र, तळंदगे येथे भेटी दिल्या. ४०० केव्ही ग्रहणकेंद्र, तळंदगे येथील नुकत्याच नादुरुस्त झालेल्या रोहित्राची उभारणी निर्धारित वेळेत पूर्ण केल्याबद्दल समाधान व्यक्त केले व भविष्यात अशा प्रकारचे बिघाड कसे थांबवता येतील याबाबत सूचना केल्या. त्यानंतर मा. अध्यक्षांनी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, तळंदगे तेथील कामाचा आढावा घेतला. प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, तळंदगे मार्फत सन २०१६-१७ मध्ये बाह्य स्त्रोतातून महसूल मिळविल्याबद्दल प्रशिक्षण केंद्राच्या चमूचे खास अभिनंदन केले.

प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राच्या सर्व टीमने नवनवीन संकल्पना राबवून अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षणाबाबत अध्यक्षांनी संपूर्ण माहिती करुन घेतली. तसेच पदव्युत्तर विद्यार्थ्यांना राज्यभार प्रेषण केंद्र, कळवा येथे प्रशिक्षण




देण्याबरोबर त्यांना विद्यावेतन देणेबाबत सकारात्मकता दाखविली. प्रशिक्षण केंद्राच्या आढावा बैठकीत वालचंद अभियांत्रिकी कॉलेज, सांगलीचे प्राध्यापक डॉ. वैद्य यांनी प्रशिक्षण केंद्राने विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी दिलेल्या योगदानाबद्दल समाधान व्यक्त केले. मा. अध्यक्षांच्या हस्ते प्रशिक्षण केंद्राच्या परिसरात वृक्षारोपण



करण्यात आले. मंडल कार्यालयाची आढावा बैठक बापट कॅम्प येथील सभागृहामध्ये पार पडली. सदर आढावा बैठकीत मा. अध्यक्षांनी प्रत्येक मंडल कार्यालयाचा आढावा घेऊन अधिकारी, अभियंत्यांना मार्गदर्शन केले.

सदर आढावा बैठक यशस्वी करण्यासाठी कराड परिमंडलाचे मुख्य अभियंता, श्री. सुरेशकुमार पाटील यांनी कार्य पाहिले. आढावा बैठकीसाठी राज्यभार प्रेषण केंद्राचे मुख्य अभियंता डॉ. संजय कुलकर्णी, सांघिक कार्यालयाचे मुख्य अभियंता, STU, श्री. श्रीराम भोपळे, अधीक्षक अभियंता, श्री. गुट्टे तसेच कराड परिमंडळाचे सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

## कळवा येथे ४०० के.व्ही. बस कंडक्टर बदलण्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण

४०० के.व्ही. ग्रहण केंद्र कळवा येथे ३६ वर्ष जुना झालेला ४०० के.व्ही. व २२० के.व्ही. मेन बस कंडक्टर बदलण्याचे काम पूर्ण करण्यात आले. ४०० के.व्ही. ग्रहण केंद्र कळवा हे मुंबई व ठाणे विभागास विद्युत पुरवठा करणारे अत्यंत महत्वाचे व ४०० के.व्ही. ग्रीडमधील फुल लोडेड उपकेंद्र असुन सदर उपकेंद्र हे सप्टेंबर १९८१ साली कार्यान्वित करण्यात आले आहे. सद्यपरिस्थितीत उपकेंद्राचा भार हा ८० टक्के आहे.




सदर बस कंडक्टर बदलण्याच्या कामात बस आऊटेज मिळणे ही फार अशक्य बाब होती. त्यामुळे पूर्ण बस बंद न करता सेक्शनप्रमाणे वेगळा करुन उर्वरित बस चालु ठेऊन बस कंडक्टर बदली करण्यात आला. तसेच आऊटेजची उपलब्धता कमी असल्यामुळे दिवस-रात्र काम करण्यात आले. तसेच या कालावधीत बस बंद असल्याचा फायदा घेऊन ३६ वर्ष जुने पेंटॉग्राफ आयसोलेटर बदलण्यात आले.

जुना बस कंडक्टर ३६ वर्षापूर्वीचा असल्यामुळे बरेच ठिकाणी रिपेअर स्लीवने दुरुस्त करण्यात आला होता. तसेच बस कंडक्टर तुटण्याचेही प्रकार घडले होते त्यामुळे सदर बस कंडक्टर बदली करणे अत्यंत आवश्यक होते. आता नवीन बस कंडक्टर बसविल्यामुळे भविष्यात बस फॉल्ट टाळले जातील. त्यामुळे उपकेंद्राची उपलब्धता वाढणार आहे तसेच ग्राहकांना अखंडित विद्युत पुरवठा करण्यास मदत होणार आहे.

सदर कामामध्ये मा. श्री. एस. टी. शिंदे, मुख्य अभियंता, वाशी परिमंडळ, सौ. जुईली वाघ, अधिक्षक अभियंता, अउदा (संवसु) मंडळ कळवा यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच श्री. एस. ओ. काटकर, कार्यकारी अभियंता, ४०० के.व्ही. ग्रहण केंद्र (संवसु) विभाग कळवा यांचे बस आउटेजचे नियोजन व पाठपुरावा यामुळे काम कमी कालावधीत पूर्ण करण्यात आले.

सदर कामाचे सुपरव्हीजन श्री. पी. ए. शेलार, अति. कार्यकारी अभियंता (देखभाल) यांच्यातर्फे करण्यात आले. तसेच त्यांना या कामात श्री. एस. एच. गोंधळी, मुख्य कार्यदेशक यांचे सहकार्य लाभले.

## अमरावती परिमंडळात जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा



अमरावती परिमंडळात जागतिक आरोग्य दिनानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले. याप्रसंगी वंदनकुमार मेंढे, श्री. अविनाश कसबेकर, श्री. नितीन कांबळे, सौ. प्रणोती देशमुख, सुनील पुरकर, अतुल वारजुरकर व अन्य.

अउदा प्रकल्प नि सं व सु परिमंडळ, अमरावती येथे जागतिक आरोग्य दिनानिमित्त रक्तदान शिबीर रक्तपेढी व रक्तघटक विलगीकरण केंद्र, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील डॉ. उकंडे, श्री. उमेश आगारकर, जनसंपर्क अधिकारी, श्री. कळसकर, श्री.वरठे, श्री.काकडे यांचे माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. या परिमंडळांतर्गत कार्यरत असलेले अधिकारी/कार्यकारी यांनी शिबीर कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेऊन रक्तदान केले. श्री. वंदनकुमार मेंढे, अधिक्षक अभियंता श्री. अविनाश कसबेकर, अधिक्षक अभियंता (स्था), श्री.नितीन कृ. कांबळे, सहा. महाव्यवस्थापक (मासं), सौ. प्रणोती देशमुख, श्री. सुनिल पुरकर, इत्यादी कार्यकारी अभियंते, श्री. अतुल वारजुरकर, प्रणाली विश्लेषक तसेच अमरावती परिमंडळातील अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच अमरावती परिमंडळाअंतर्गत असलेले अउदा सं. व. सु. मंडळ, अकोला व अउदा सं. व. सु. विभाग, यवतमाळ येथे ही रक्तदान शिबीराचे आयोजन करुन जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला.

# सहायक अभियंत्यांच्या पायाभूत(इंडक्शन) प्रशिक्षणास प्रारंभ




सन २०१७-१८ या वर्षात महापारेषण कंपनीतर्फे सहायक अभियंत्यांची निवड सरळसेवा भरतीद्वारे करण्यात आली. या अभियंत्यांमध्ये दूरसंचार शाखेचे २५ व स्थापत्य शाखेच्या ७० अभियंत्यांचा समावेश आहे. या अभियंत्यांचे पायाभूत (इंडक्शन) प्रशिक्षण कार्यक्रमात तज्ज्ञांचे मार्गदर्शन, चर्चासत्रे, प्रात्यक्षिके व शैक्षणिक सहली यांचा समावेश होतो. शेवटी चाचणी परीक्षा घेण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाअंतर्गत सहायक अभियंता (दूरसंचार) याचे इंडक्शन प्रशिक्षण प्रादेशिक केंद्र, वाळुज (औरंगाबाद) येथे सुरु झाले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मासं) यांनी केले. यावेळी अधिक्षक अभियंते सर्वश्री सैद नासिर कादरी, गोविंद जाधव व शशिकांत बाकरे व सहायक महाव्यवस्थापक (मासं) श्री. विष्णु कांबळे उपस्थित होते. श्री. सुरज वाघमारे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. शशिकांत बाकरे यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती दिली. श्री. सैद नासिर कादरी, गोविंद जाधव व विष्णू कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

तसेच सहायक अभियंता (स्थापत्य) यांना दिले जाणारे इंडक्शन प्रशिक्षण नाशिक येथील महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण संस्था (मेटा) येथे



आयोजित करण्यात आले. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्यावेळी सर्वश्री उमाकांत कावळे, मुख्य अभियंता (स्थापत्य), सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मासं), श्री. अरविंद गवाणकर, उप-महाव्यवस्थापक (मासं-प्रशिक्षण), संदिप हाके, अधिक्षक अभियंता (स्थापत्य) व मेटाचे अधिक्षक अभियंता व सहसंचालक श्री विकास रामगुडे उपस्थित होते. श्री. उमाकांत कावळे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. सुधीर वानखेडे यांनी प्रशिक्षणाचे स्वरुप व प्रशिक्षण काळातील नियमावलीसंबंधी माहिती दिली. श्री. संदिप हाके यांनी ही यावेळी मार्गदर्शन केले.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे एप्रिल/ मे -२०१७

| नियुक्ती- | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **नाव (सर्वश्री)** | **पद** | **पदस्थापनेचे ठिकाण** | **दिनांक** |
| १. | शिवाजीराव पाटील | मुख्य विधी सल्लागार | सांघिक कार्यालय, मुंबई | २३.०५.२०१७ |
| २. | श्रीकांत सदाशिव राजुरकर | मुख्य अभियंता | सांघिक कार्यालय, मुंबई | २१.०४.२०१७ |
| ३. | पीयूष सुरेंद्रपाल शर्मा | अधीक्षक अभियंता | सांघिक कार्यालय, मुंबई | ०६.०४.२०१७ |
| निवृत्ती- | | | | |
| **अ.क्र.** | **नाव (सर्वश्री)** | **पद** | **पदस्थापनेचे ठिकाण** | **दिनांक** |
| १. | काकासाहेब जगताप | मुख्य विधी सल्लागार | सांघिक कार्यालय, मुंबई | २२.०५.२०१७ |
| २. | नागनाथ रामचंद्र सोनकवडे | अधीक्षक अभियंता | सांघिक कार्यालय, मुंबई | ३१.०५.२०१७ |

## मुख्य अभियंता श्री.जी.टी.मुंडे यांचे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना मार्गदर्शन

अउदा स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था मंडल औरंगाबाद येथे परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री.जी.टी.मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना महापारेषण कंपनीमध्ये थेट लॉटरी पध्दतीने काम देण्याबाबतच्या योजनेनुसार लॉटरी पद्धतीने ५९,४४,०००/- रुपयांच्या कामाचे वाटप करण्यात आले. या वेळी मुख्य अभियंता, श्री.जी.टी.मुंडे यांनी बेरोजगार अभियंत्यांना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या शंकाचे निरसन केले. श्री.जी.एल.जाधव, अधीक्षक अभियंता, अउदा स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था मंडल यांनी या योजनेचे मार्गदर्शक तत्वे सर्वांना समजावून सांगितले. या सोडतीकरिता श्री.ए.आर.भारसाखळे (अधीक्षक अभियंता), श्री.एच.आय.खान (कार्यकारी अभियंता), श्री.व्ही.व्ही.कानडे (कार्यकारी अभियंता), श्री.एस.पी.कांबळे (कार्यकारी अभियंता), श्री.एन.एन.भंडे, व्यवस्थापक, (विवले), श्री. एन एस. नवले, व्यवस्थापक (मासं) श्री. बी. डी. गुळभिले, सहायक अभियंता यांची उपस्थिती होती.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महापारेषण कंपनीत उत्साहात साजरी



महापारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सांघिक कार्यालयात संचालक. (प्र), श्री. रविंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी गण उपस्थित होते. याप्रसंगी सर्वांनी युगपुरुषाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

तसेच महाराष्ट्रातील महापारेषण कंपनीच्या कार्यालयात जयंती उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. अउदा प्रकल्प संवसु परिमंडळ नाशिक कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले तसेच निबंध लेखन व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्रिवार अभिवादन.

## लोणावळ्यात प्रकल्प अभियंत्यांचे शिबीर संपन्न




लोणावळा येथे प्रकल्प अभियंत्यांसाठी दोन दिवसांचे शिबीर घेण्यात आले. सदर शिबीरासाठी सर्वश्री, रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प), विनायक साठे, संचालक (वित्त), सूरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मासं), राजेंद्र गायकवाड, मुख्य अभियंता, सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मासं-तांआ) हे उपस्थित होते. या शिबीरासाठी वाशी, औरंगाबाद व कराड परिमंडळामधून आलेल्या सुमारे ९० प्रकल्प अभियंत्यांनी भाग घेतला. या शिबीरामध्ये प्रकल्प अभियांत्रिकीमधील विविध विषयावर व्याख्याने झाली. त्याचप्रमाणे सादरीकरणे,



चर्चासत्रे, केस स्टडी, यशोगाथा, प्रकल्प साकारत असताना आलेले अनुभव यांचा ऊहापोह झाला. प्रशिक्षणार्थी अभियंत्यांच्या समस्यांवर तज्ज्ञ व अनुभवी अधिकारी व व्याख्यात्याकडून मार्गदर्शन करण्यांत आले.

अशा प्रकारची दोन शिबीरे लवासा व लोणावळा येथे याआधी संपन्न झाली. त्यात नागपूर, अमरावती, पुणे, व नाशिक परिमंडळातून आलेल्या प्रकल्प अभियंत्यांनी भाग घेतला होता. या शिबीराची व्यवस्था श्री. शशिकांत बाकरे, अधिक्षक अभियंता (प्रशिक्षण) व श्री. योगेश पाचपांडे, कार्यकारी अभियंता प्रकल्प यांनी त्यांच्या सहका-यांसह पार पाडली.

## जागतिक आरोग्यदिनी सांघिक कार्यालय, प्रकाशगंगा येथे विविध कार्यक्रम



जागतिक आरोग्य दिनानिमित्त सांघिक कार्यालय, प्रकाशगंगा येथे विविध कार्यक्रम घेण्यात आले.

या पार्श्वभूमीवर महापारेषण कंपनीच्यावतीने सांघिक कार्यालय तसेच सर्व परिमंडळस्तरावर दि. ०७ एप्रिल २०१७ या दिवशी ऐच्छिक रक्तदान शिबीर तसेच वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित केले होते. या दिवशी सांघिक कार्यालय तसेच सर्व परिमंडळस्तरावर एकूण ५१५ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. तसेच १०२५ कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय तपासणी केली. सांघिक कार्यालयाच्या वतीने प्रकाशगंगा येथे रक्तदान शिबीर आयोजित केले होते. सदर शिबीराचे उद्घाटन मा. श्री. विनायक साठे, संचालक (वित्त), महापारेषण यांच्या हस्ते तसेच श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं), श्री. अनंत पाटील. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. तसेच वैद्यकीय तपासणी शिबीराचे उद्घाटन श्री. अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. तसेच वैद्यकीय तपासणी शिबीराचे उद्घाटन श्री. शेखर सावळे, कार्यकारी सचिव, CMD Office यांच्या हस्ते झाले. सांघिक कार्यालयात एकूण ४५ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले व १८० कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय तपासणी शिबीराचा लाभ घेतला. सदर शिबीरास मा.श्री. ओ. के. एम्पाल संचालक (संचलन), यांनी रक्तदात्याशी चर्चा केली, तसेच त्यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप केले. याप्रसंगी मा. श्री. विनायक साठे संचालक (वित्त), यांनी शिबीरामध्ये सहभाग नोंदवून रक्तदान केले. तसेच या शिबीरास श्री. भाऊराव राऊत, मुख्य अभियंता, अमरावती व श्री. रोहिदास म्हस्के, मुख्य अभियंता, पुणे यांचीही उपस्थिती लाभली.

दि. ०७.०४.२०१७ रोजी पुणे येथील के.ई.एम. रुग्णालयाच्या वतीने महापारेषण कार्यालयात रक्तदान शिबीर सुरु असताना अत्यंत तातडीने रुग्णालयाकडून AB रक्तगटाच्या तीन युनीटची मागणी आली. सदर रुग्णालयात लिव्हर ट्रान्स्फरमेशनसाठी रक्ताची खूप आवश्यकता होती ती आपण पुणे येथील रक्तदानातून पूर्ण करु शकलो, अशी माहिती श्री. प्रशांत चौधरी, सहा महाव्यवस्थापक, (मासं) पुणे परिमंडळ यांनी दिली. सांघिक कार्यालयातील



वैद्यकीय शिबीर हे फोर्टीस रुग्णालय मुलुंड, यांच्यातर्फे आयोजित करण्यात आले व रक्तदान शिबीर राज्य रक्त संकलन परिषदेतर्फे आयोजित केले गेले. सदर कार्यक्रमास श्री. भरत पाटील, उप-मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व श्री. पारस सवाई (व्यवस्थापक,मा.सं.तां.आ) यांनी प्रयत्न केले.

सामाजिक बांधिलकी म्हणून प्रत्येकाने कंपनीच्या सदर धोरणास हातभार लावला त्याबद्दल मा. कार्यकारी संचालक (मासं), यांनी सर्वाचे कौतुक केले.

## नाशिक परिमंडळामध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा




अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नाशिक येथील महापारेषण इमारतीच्या प्रांगणात महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी श्री. किशोर जाधव, अधीक्षक अभियंता, यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी नाशिक परिमंडळातील श्री. किशोर जाधव अधीक्षक अभियंता, श्री. जे. जी. चुडे, अधिक्षक अभियंता, श्री. तानाजी वाघमारे दक्षता व सुरक्षा अधिकारी, श्री. श्रीकृष्ण नवलाखे कार्यकारी अभियंता, श्री. सुनील तिरमारे कार्यकारी अभियंता, श्री. प्रविण ढोरे कार्यकारी अभियंता, श्री. शिरीश लघाटे कार्यकारी अभियंता, श्री. भूषण पाटील अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री. ईश्वर लोहार व्यवस्थापक (विवले), कु. वैशाली रामटेके, व्यवस्थापक (मासं), श्री. बाबुराव ताजणपुरे, उप-व्यवस्थापक (लेखा), तसेच इतर मान्यवर अधिकारी/कर्मचारी या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. राजेंद्र ताडगे, उप-व्यवस्थापक (मासं), यांनी केले.

## इंडिया टेक गव्हर्निंग कंपनीतर्फे मुंबईत चर्चासत्र संपन्न

इंडिया टेक गव्हर्निंग कौन्सिल यांच्यावतीने "९ वी राष्ट्रीय बैठक : Renewtech India 2017" या विषयावरील चर्चासत्र मुंबई येथे घेण्यात आले. या चर्चासत्राचे उद्घाटन श्री. पी. उमाशंकर, (पूर्व) सचिव ऊर्जा सेक्रेटरी (पावर), भारत सरकार व अध्यक्ष, इंडिया, टेक गव्हर्निंग कौन्सिल यांच्या हस्ते झाले.

दि. ३ व ४ मे, २०१७ रोजी दोन दिवस चाललेल्या या सत्रामध्ये सन २०२२ मधील १७५ गिगावॅट ऊर्जेचे लक्ष साधण्यासाठी आपल्यापुढील आव्हाने, यासाठी विविध संस्थानी दिलेले योगदान, अपारंपारिक व नुतनीकरणक्षम ऊर्जा निर्मिती, पम्पड स्टोअरेज प्लांट्स, भार नियंत्रण केंद्राच्या जबाबदाऱ्या, पारेषण व वितरण तंत्रज्ञानामधील आधुनिक बाबी इत्यादी विषयांवर व्यापक चर्चा झाली.

या बैठकीसाठी महापारेषणाचे श्री. वसंत पांडे, अधिक्षक अभियंता, भार प्रेषण केंद्र, ऐरोली व श्री. शशिकांत बाकरे, अधिक्षक अभियंता, प्रशिक्षण, सांघिक कार्यालय उपस्थित होते.

## तिन्ही ऊर्जा कंपन्यांचे कार्यकारी संचालक (मासं) यांची बैठक



महापारेषण कंपनीच्या सांघिक कार्यालय प्रकाशगंगा या ठिकाणी श्री.विनोद बोंद्रे, कार्यकारी संचालक (मासं), महानिर्मिती, श्री. सचिन ढोले, कार्यकारी संचालक, (मासं), महावितरण व श्री. सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक, (मासं), महापारेषण यांची मानव संसाधनविषयक विषयावर दि. ०३.०५.२०१७ रोजी बैठक झाली.

सदर बैठकीमध्ये तिन्ही ऊर्जा कंपन्यांच्या कार्यकारी संचालकांनी मानव संसाधन विभागाच्या प्रश्नांबाबत तिन्ही कंपन्यांमध्ये समन्वय असावा, असे मत व्यक्त केले. त्याचप्रमाणे मानव संसाधन प्रश्नांबाबत तत्परतेने निर्णय घेण्याच्या दृष्टीने अशी बैठक नियमित आयोजित केली जावी, असेही मत व्यक्त केले. सदर बैठकीस श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं), श्री. मारुती भांडारवाड, मुख्य महाव्यवस्थापक (मासं), महानिर्मिती, श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मासं) महापारेषण, श्री. आनंद कोंत, महाव्यवस्थापक (मासं), महानिर्मिती व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### अभिनंदन

**राष्ट्रीय कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेत वृंदा आव्हाडला सुवर्णपदक**

नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेत कु. वृंदा जनार्दन आव्हाड हिने सुवर्णपदक पटकाविले तसेच आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेसाठी तिची इंग्लंडसाठी निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## जागतिक आरोग्य दिनानिमित्त नाशिकमध्ये मोफत आरोग्य तपासणी

जागतिक आरोग्य दिनानिमित्त उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नाशिक येथील महापारेषण परिमंडळ कार्यालयात होकॉर्ट हॉस्पीटल नाशिक यांच्यातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.

प्रथम होकार्ट हॉस्पीटलचे डॉ. बावीस्कर यांचा सत्कार श्री. राहुल सुतार, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) यांनी केला. त्यानंतर होकॉर्ट हॉस्पिटलचे नाशिक यांच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. यामध्ये रक्त तपासणी, रक्तातील साखर, बी.पी. इसीजी इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. यावेळी महापारेषण परिमंडळातील अधिकारी व कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

होकार्ट हॉस्पीटल नाशिक येथील डॉ. बाविस्कर यांनी कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना चांगले आरोग्य राहण्याकरिता व्यायामाचे महत्त्व व काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले. यामध्ये १०६ कर्मचाऱ्यांनी या मोफत तपासणी शिबीराचा लाभ घेतला.

## नाशिक परिमंडळात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नाशिक येथील महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

मुख्य अभियंता श्री. बी. टी. राऊत, यांनी महात्मा ज्योतीराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी मोठ्या संख्येने अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी श्री. बी. टी. राऊत मुख्य अभियंता यांनी युगपुरुषाच्या कार्याची माहिती देऊन त्यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.


श्री. राहुल सुतार, सहा.महाव्यवस्थापक (मासं), श्री. विजय नलावडे, सहा.महाव्यवस्थापक (विवले) श्री. बारकू पेढेकर, कार्यकारी अभियंता, श्री. भूषण पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी आपले विचार व्यक्त केले. या प्रसंगी मोठ्या प्रमाणात अधिकारी / कर्मचारी तसेच महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री. राहुल सुतार, सहा.महाव्यवस्थापक (मासं) यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने परिमंडळातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# From the Desk of ED, HR

## नैतिकतेचा प्रवास आनंदाचा

मित्रहो, सर्व जग आणि आपला समाज नैतिकतेने बांधलेला आहे आणि आपण सर्व जण त्या नैतिक साखळीचे अपरिहार्य भाग आहोत. नैतिकता ही केवळ माणसाची मक्तेदारी आहे, असे मात्र मानण्याचे कारण नाही. कारण सर्व सृष्टीमध्ये नैतिकतेची एक लय आपल्याला पाहायला मिळते. त्यामुळेच शतकानुशतके सृष्टीचा हा प्रवास चालला आहे. त्या प्रवासाचा आपण एक भाग आहोत, याचे भान आपल्याला ठेवलेच पाहिजे.

माणूस विचार करणारा प्राणी आहे आणि त्या नात्याने त्याच्यावर नैतिकतेची सर्वात अधिक जबाबदारी येऊन पडली आहे. अर्थात त्याने ती मान्यही केली आहे. त्यामुळेच तो आजपेक्षा उद्याचा दिवस अधिक चांगला कसा जाईल, याचा सतत विचार करत असतो. कारण जे संस्कार त्याने आपल्या आई-वडील आणि पूर्वजांकडून घेतले आहेत, तेच संस्कार त्याला आपल्या पुढील पिढ्यांना द्यायचे आहेत. संस्काराचेच दुसरे नाव नैतिकता आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.




जीवन जगत असताना नैतिकता ही काही घराच्या चार भिंतीपुरती मर्यादित नाही. ती समाजात वावरतानाही महत्वाची आहे आणि आपण जेथे काम करतो, तेथेही तेवढीच महत्वाची आहे. याचे कारण आपले आयुष्य म्हणजे घराच्या चार भिंतीतील नसून आपले सामाजिक आयुष्यही तेवढेच किंवा ते त्यापेक्षाही महत्वाचे आहे. आपण जेथे काम करत असतो, तेथे तर आपल्याला आपली स्वतंत्र ओळख मिळत असते. माणूस आयुष्यभर आपल्या स्वतंत्र ओळखीसाठी आणि मानवी प्रतिष्ठेसाठी प्रयत्न करत असतो. कारण त्यातूनच त्याला समाधानी आणि आनंदी जीवनाचा लाभ होऊ शकतो. समाधान आणि आनंदी आयुष्याच्या मुळाशी आहे, ती नैतिकता. ती नसेल तर आपल्याला अचानक खूप यश मिळून जाईल. भरपूर संपत्ती, पैसाही मिळेल, त्यामुळे कुटुंबीय, सहकारी आणि समाज आपल्याला तात्पुरता मानही देईल, पण त्या यशाला आणि पैशाला जर नैतिकतेचा आधार नसेल तर आपल्या अपरोक्ष आपण मानहानीचे धनी आहोत, हे पक्के लक्षात ठेवावे. जो माणूस नैतिकतेच्या पायावर ठामपणे उभा आहे, त्याला केवळ मान नाही तर सर्वांचा आदर मिळेल. ज्या आदरासाठी माणूस आयुष्यभर प्रयत्नशील असतो.

नैतिकता ही फार काही तरी प्रयत्नपूर्वक राखण्याची गोष्ट आहे, असे अनेकांना वाटते. पण नैतिकतेची कास धरणे, ही फार सोपी गोष्ट आहे. ती आपण काही मुद्यांनी समजून घेऊ.

१. आपल्याशी इतरांनी कसे वागावे, असे आपल्याला वाटते, तसेच आपण इतरांशी वागत आहोत ना ?

२. आपली कुटुंबातील, कार्यालयातील आणि समाजातील जी भूमिका आहे, ती आपण मान्य करीत आहोत ना ? आणि त्या भूमिकेला न्याय देत आहोत ना ?

३. समाजाला चांगले होण्यासाठी परस्परांचा विश्वास वाढीस लागण्याची गरज आहे. तो आपल्या बाजूने अधिकाधिक वाढत जावा, असेच आपले वर्तन आहे ना ? समाजात आपण आपल्याला तेवढे विश्वासार्ह बनविले आहे ना ?

४. आपल्याला आपल्या प्रयत्नांनी किंवा परिस्थितीने दिलेल्या संधीने समाजाची आणि देशाची सेवा करण्याचे भाग्य मिळाले आहे. त्याचे महत्व आपण जाणले आहे ना ? की आपण त्या संधीचा गैरफायदा घेत आहोत ?

५. केवळ मानवी समाजाची नव्हे तर सर्व सृष्टीही परस्परांवर अवलंबून आहे. कोणीतरी दिवसरात्र काम करतो म्हणून आपल्याला घरबसल्या अनेक गोष्टी मिळतात आणि आपले जीवन सुखकर होते, याची जाणीव आपण ठेवतो आहोत ना ?

६. नैसर्गिक संपत्ती आणि माणसाने निर्माण केलेल्या संपत्तीवर सर्वाचा सारखा अधिकार आहे.त्यामुळे संपत्तीला ओरबाडण्याचे पाप तर आपण करत नाही ना? संपत्ती वितरणात न्याय्य भूमिका आपण घेऊ शकतो ना ?

७. आपण समाजाकडून म्हणजे देशाकडून ज्या सेवा घेत आहोत, मोबदला घेत आहोत, त्याबदल्यात आपण समाज आणि देशाच्या पारड्यात योग्य माप टाकतो आहोत ना ?

८. आपले आपल्या मुलाबाळांवर प्रचंड प्रेम आहे आणि त्यांनी सुखी, समाधानी आणि आनंदी आयुष्य जगावे, असे आपल्याला वाटते आहे. पण त्यासाठी त्यांच्या वाट्याला तेवढाच चांगला निसर्ग, साधनसामुग्री आणि व्यवस्था येईल, यासाठी आपण प्रयत्न करत आहोत ना ?

९. मानवी आयुष्य अनमोल आहे, त्यामुळे वेळ अमूल्य आहे. आपली वेळ अमूल्य आहे, तशीच इतरांचीही वेळ तेवढीच अमूल्य आहे, याचे आपल्याला भान आहे ना ?

१०. संवेदना, प्रेम आणि क्षमाशीलता याला मानवी जीवनात अतिशय महत्व आहे. आधुनिक जगाच्या वाढत चाललेल्या गुंतागुंतीत याचे भान आपण ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोत ना ?

मला खात्री आहे की, या प्रश्नांची उत्तरे आपण अतिशय प्रामाणिकपणे दिलीत तर आपण नैतिकतेच्या परीक्षेत सहज उत्तीर्ण होऊ शकतो. त्यासाठी खूप खूप शुभेच्छा !

**सुरज वाघमारे**
कार्यकारी संचालक (मासं)

**संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)**
**E-mail : prohr@mahatransco.in**
**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO **For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra - Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.